# ४७. बदलत्या समाज मनाची गोष्ट

बरेच वर्षांनी आमच्या कॉलेजच्या ग्रुपची मैफल जमली होती. मुद्दाम फोन करून आम्ही ही मैफल जमवली होती. जवळजवळ ३५ वर्षांचा काळ लोटला होता. तसे बरेच जण अधून मधून भेटत पण फारसे बोलणे होत नसे.
प्रत्येकाला किती बोलू आणि किती नाही असे झाले होते. प्रत्येकाने मोकळेपणी स्वतःचा गेल्या ३५ वर्षांचा लेखाजोखा मांडला. नोकरीत , व्यवसायात काय केले इतपासून कौटुंबिक आयुष्य याचे वर्णन झाले.

मैफल जवळ जवळ ५ तास चालली होती. बोलता बोलता **soft drink !** व फराळ चालूच होता.

सर्वच जण आपल्या व्यवसायात / नोकरीत चांगलेच स्थिरावले होते. काही जणांनी निवृत्ति घेतली होती. काही जण निवृत्तिच्या विचारात होते. तर काही जणांच्या कौटुंबिक जबाबदा-या बाकी असल्यामुळे काही वर्षे काम करणे भाग होते. कौटुंबिक परिस्थिती जवळ जवळ सर्वांचीच चांगली होती. बायकोचे कौतुक सर्वजणच करत होते.व्यवसायात ,नोकरीत असलेले ताण तणाव सहन करायला चांगल्या सहचारिणीची गरज सर्वांनाच होती व त्या बाबतीत सर्वजण चांगल्या नशिबाचे निघाले होते. प्रश्न जरा पोराबाळांचाच होता. तसे वरकरणी बघता सर्वजण ‘लायनीत’ होते. पण मुलांशी सूर मात्र फारसे जुळलेत असे वाटत नव्हते. सर्वांच्याच बोलण्यात एक प्रकारचा कोरडेपणा , मुलांची काळजी डोकावत होती. मुलांचे शिक्षण पूरे झाले होते. सर्वजण चांगली नोकरी करत होते. पैशाची आवक फारच होती. पण आईवडिलांबरोबर जिव्हाळयाचे संबंध फारसे नव्हते. नाही म्हणायला आई वडिलांची गरज पदोपदी लागत होती. काहींची लग्ने झाली होती. जावई , सुना तोलामोलाच्या होत्या. मुलगी / जावई किंवा मुलगा सुनांचे एकमेकांशी जमत होते. तसे वरकरणी तरी मतभेद नसावेत असे चित्र होते.

थोडक्यात म्हणजे कुठे तरी मन खट्टू होते. जेवढी तार प्रत्येकाची बायकोबरोबर जुळली होती तेवढे सूर मुलाबाळांबरोबर उमटत नव्हते.

मैफलीचे वातावरण जरा गंभीर होऊ लागले. ताण वाढत होता. फराळांवरचे लक्ष उडाले होते. मग मी मैफलीचा ताबा घेतला. मी म्हणालो की ज्या प्रश्नांचा आपण उहापोह केला त्यांचे उत्तर काळच देईल. आपण मात्र आपल्या नेहमीच्याच शैलीत जगले पाहिजे व भविष्याचा विचार फारसा करण्यात अर्थ नाही. मी प्रश्नागणिक उत्तरे देण्याचा प्रयत्न करणार नाहीये तर आजकल विचारांची , वागण्याची दिशा काळानुसार कशी बदलत जातेय त्याचे चित्र मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

शेवटी कोणाचे वागणे बरोबर व कोणाचे चूक ह्याचे उत्तर माणसागणिक बदलेल. आयुष्यातील बरेच झगडे , भांडणे , मतभेद हे दोन बरोबर गोष्टींमध्येच जास्त असतात.

प्रत्येकजण स्वतःच्या मनात दुस-याने आपल्याशी कसे वागले पाहिजे ह्याचे चित्र तयार करतो. जर दुसरा माणूस त्या चित्रांनुसार वागला तर तो माणूस त्याला आवडतो. परंतु बरेच वेळेला हे घडतेच असे नाही.

दळणवळणांची साधने वाढत आहेत पण माणसा माणसातील संवाद कमी होत आहे. शिक्षणाचे दरवाजे उघडत आहेत पण माणसांशी संवाद कसा साधावा, त्याच्या मनातील भावना कशा ओळखाव्या, त्याचे विश्लेषण कसे करावे, त्याग म्हणजे काय ? अशा कितीतरी गोष्टी आजच्या शिक्षण पद्धतीमध्ये शिकवल्याच जात नाहीत. जे अभ्यासक्रमात नाही ते तर शिकायचा प्रश्नच उद्‌भवत नाही कारण शिक्षण फक्त मार्क मिळवण्यासाठीच असते.

आज प्रत्येकजणच स्वतःचा व स्वतःपुरता विचार करताना दिसतो. दुस-यांचा विचार करण्याचा प्रश्नच येत नाही असा हा काळ. परंतु अजूनही आपल्या वागण्याचा दुस-याला त्रास होत नाही ना हे बघणारे थोडे लोक आहेत म्हणून समाजाचे डोके ठिकाणावर आहे.

सुखाची व्याख्या बदललेले हे दिवस. भौतिकगोष्टींची घरात गर्दी म्हणजे सुख. सुख हे प्रथम मनात निर्माण होते व मग चेह-यावर दिसते. भौतिक गोष्टी फक्त सुखाचा भ्रम निर्माण करू शकतात.

हल्ली प्रेम म्हणजे फक्त शारीरीक व भौतिक दर्जाचे. प्रेमात त्याग असतो हे सोयीस्कररित्या लक्षात येत नाही किंवा घेतले जात नाही.

ज्या शिडीवरून आपण वरचा स्तर गाढला त्या शिडीलाच पाय मारण्याचे हे दिवस.

आज कामातला आनंद घ्यायला वेळच नाही. घडयाळाच्या काटयाप्रमाणे काम करणे व जास्तीत जास्त पैसा मिळविणे व सुखदेणा-या गोष्टी खरीदणे हेच ध्येय बनवून गेले आहे. ह्या प्रवासात आपण आपली फरफट तर करतोच पण आपल्या कुटूंबाची सुद्धा फरफट होते हे आपल्या लक्षातही येत नाही. ह्या अश्या फरफटीचे हे दिवस.

आपली स्वप्नपूर्ती होणे ही यशस्वीपणाची व्याख्या असू शकेल पण जे मिळाले आहे त्यावर प्रेम करणे, स्वीकारणे ही नक्कीच सुखाची व्याख्या आहे.

सर्वजणांचा ताण थोडा हलका झाला होता व परत भेटायचे ठरवून आम्ही एकमेकांचा निरोप घेतला.

काय मित्रांनो कराल विचार ह्या गोष्टीवर, काही वेगळा विचार सुचला तर घालाल माझ्या कानावर ?